**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाच्या मुलांच्या वसतीगृहाच्यावतीने ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह’ निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मुलांच्या वसतीगृहाच्यावतीने दि. १० एप्रिल ते दि. १४ एप्रिल, २०१८ या कालावधीत समता पर्व २०१८ निमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी शिक्षणमहर्षी डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतीदिनी त्यांचे विचार व कार्याला अभिवादन करुन वसतीगृह व विद्यापीठ परिसराची स्वच्छता करण्यात आली. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्ताने विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले अभ्यासिकेचे उद्‌घाटन करण्यात आले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना करुन सलग अठरा तास अभ्यासाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख, अधिसभा सदस्य तथा वसतीगृह अधीक्षक डॉ. रविंद्र सरोदे उपस्थित होते. ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह’ निमित्त राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित स्पर्धा परीक्षा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन व विद्यार्थ्यांनी आपल्या वैयक्तिक वर्गणीतून पुस्तके दान दिली, आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

‘राष्ट्रनिर्माणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान’ या विषयावर श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एम.आर. इंगळे यांचे व्याख्यान संपन्न झाले.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १४/०४/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी